# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४८१ दिनांक २९/०५/२०२०

दिनांक २८/०५/२०२० रोजी रात्रै १२.३० वाजताचे सुमारास आरोपीत क्रमांक १ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन भालीवली, पो.भालीवली, ता.वसई, जि.पालघर येथे असलेले महादेव मंदिरात घुसुन मंदीरातील पुजारी (फिर्यादी) व त्यांचे सोबत काम करणारे यांना मारहाण करुन व राहत असलेल्या रुमची खिडकीची काच फोडुन दरवाजावर दगड मारुन फिर्यादीचे रुमचे पायरी वरील स्टाईल फर्शी तोडून नुकसान केले तसेच मंदिरातील वस्तु व दानपेटीतील रोख रक्कम असा एकुण ६,८००/- रुपये किंमतीचा ऐवज जबरीने चोरी करुन घेवुन गेले म्हणुन विरार पोलीस ठाणे गु.र.नं. I ५५८/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९४, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयात आरोपीत क्रमांक १ यास दिनांक २८/०५/२०२० रोजी तर आरोपीत क्रमांक २ व ३ यांना दिनांक २९/०५/२०२० रोजी अटक करण्यात आली असुन आरोपीत यांचे ताब्यातुन चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी १७३८/- रुपये रोख रक्कम व १२००/- रुपये किंमतीचे अर्धा लिटर मापाचे ४ ताब्याचे कलश असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची घटना ही चोरी करण्याच्या उद्देशाने घडली असुन सदर प्रकाराबाबत कोणीही समाजामध्ये सोशल मिडीयाचे माध्यमातुन चुकीची माहीती पसरवु नये.

Scanned by CamScanner